

# संतांचे हे आर्त —

सौ. ऐश्वर्या डगांवकर.

①

आपला महाराष्ट्र हा दऱ्याखोऱ्यांनी भरलेला, रानावनांनी झाकलेला. गिरीशिखरांनी सजलेला. अशा ह्या गिरीशिखरांवर शंकर म्हणजेच महादेव ध्यान करण्यासाठी ठाण मांडून बसले आहेत. 12 ज्योतिर्लिंगांपैकी पांच ठिकाण आपल्या महाराष्ट्रातच. त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, घृष्णेश्वर, नागनाथ, परळी वैजनाथ. ह्याशिवाय अनेक शिवमंदिरे तर आदिशक्तीची पीठे, तर जगदंबेचे पण अनेक ठिकाणे ह्या महाराष्ट्रात आहेत.

परंतु हे शंकर भगवान ध्यान कुणाचे करतात तर श्रीहरिचे म्हणजे विष्णुचे. श्रीहरिचा भक्त शंकर व शंकराचा भक्त उपासक श्रीहरि. असे हे अद्वैत फक्त महाराष्ट्रातच मिळते. असा हा आपला महाराष्ट्र शिवशक्ति देश. प्रकृति व पुरुषाचा मिलाप. त्यांची सर्वांची भक्ति करणारे अनेक साधु-संत पण महाराष्ट्रातच जन्मले. त्यातच जेजुरीचा खंडोबा पंढरीचा विठूराया. कोल्हापुरची जगदंबा. तर तुळजाभवानी हे महाराष्ट्राचे आद्य देवीदेवता. त्यांचेच अनेक भक्त संत झाले. त्यातच तुकाराम, श्री ज्ञानेश्वर, श्री एकनाथ. श्री नामदेव तर श्री रामदास, गोरा कुंभार, कान्होपात्रा. सखुबाई. जनाबाई. चोखा मेळा, नरहरि सोनार एक ना अनेक भक्त विठ्ठलाच्या भक्तित रंगले आहे.

अठ्ठावीस युगांपासून तो सावळा मुरारी पण कटीवर हात ठेवून आपल्या भक्तांची वाट पहात आहे. त्याचे भक्त खूप महान आहेत. त्यांना मरणाचे भय नाही. हाती टाळ मृदंग खांद्यावर पताका घेऊन ते सारे हरिभजनात रंगले आहे. त्यांच्या नामस्मरणाने सारे आकाश दुमदुमले आहे. टाळमृदंगांचा जयघोष सुरू आहे. तुळशी मंजि-यांचा वास घमघमला आहे तर आसमंतात बुक्का अभीर. गुलाल उधळला आहे.

संतांचे हे आर्त... (2)

पंढरीच्या वाळवंटात हा सर्व जयघोष कुणी मांडला आहे? साधुसंतांचा मेळा कुणी भरवला आहे? भक्तीचे हे देऊळ कुणी उभे केले? श्रीहरिच्या नाम-स्मरणात सर्वात आधी त्या चंद्रभागेच्या वाळवंटात कोण नाचले तर निवृत्तीनाथांनी हे सुरू केले. सोपान मुक्ताबाई व संत श्री ज्ञानोबा ह्यांनी हे सर्व सुरू केले. त्याचप्रमाणे येथे मी काही वेगळेच भजन म्हणा अभंग म्हणा घेतली आहेत त्याचा माझ्या परीने मी अर्थ लावण्याचा एक वेडा अट्टाहास केला आहे. पहा आपणास आवडतो का.

संत श्री ज्ञानेश्वर म्हणतात,

घनु वाजे ~~घुण~~ घुणघुणा । वारा वाहे रूणझुणा ।
भवतारकु हा कान्हा । वेगीं भेटवा का ॥
चांदु वो चांदणे । चांपे वो चन्दनें ।
देवकीनंदनेवीण । नावडे वो ॥
चंदनाची चोळी । माझी सर्व अंग जाळी ।
कान्हो वनमाळी । वेगीं भेटवा का ॥

ह्या अभंगात ज्ञानदेवांनी त्या व्याकुळ झालेल्या गोपींचे वर्णन केले आहे. श्रीहरि त्यांना सापडत नाही त्यामुळे त्याच्या दर्शनाकरता त्या व्याकुळ झाल्या आहेत. आभाळ भरून आले आहे. वारं सुटलं आहे. चंद्राचे चांदणे पण अंगणात पडले आहे. चाफ्याचा सुंदर वास दरवळतो आहे तर चंदनाच्या सुवासाने सारा आसमंत दरवळला आहे. पण ह्या सर्वांमध्ये देवकीनंदन कुठेच दिसत नाही. सर्व गोपींनी अंगावर चंदनाचा लेप लावला आहे पण ते सर्व त्यांना नकोसे वाटते. त्यांच्या अंगाची लाहीलाही होते आहे. कारण कृष्णाविना त्यांना काहीच सुचत नाही. त्याच्या विरहात त्या व्याकुळल्या आहेत. त्या एकमेकींना विचारतात कान्ह्याला आम्हाला सत्वर

SWD

## संतांचे हे आर्त

③

भैरवा कुणी त्याला पाहिले का?
पैलतोगे काऊ कोकताहे।
शकुन गे माये सांगताहे।।
उड उड रे काऊ तुझे सोन्याने मढविन पाऊ।
पाहुणे पंढरीराऊ घरा कै येती।
दहिभाताची उंडी लाविन तुझिये तोंडी।
जीवा पढिये त्याची गोडी सांगे वेगी।
दुधे भरूनि वाटी लाविन तुझिये ओठी
सत्य सांगे गोठी विठो येईल काई।।

वनमाळ्यांला विचारतात. सरती एकमेकींना विचारतात. बाहेर दाराशी कावळा काव काव करत आहे मला वाटते दाराशी कोणी पाहुणा आला तो काहीतरी शकुन म्हणजेच काही चांगली बातमी घेऊन आला आहे. त्या कावळ्याला त्या विचारतात श्रीहरि कधी येईल? मी तुला दहीभात खायला देईन. दूधाची वाटी तुझ्या ओठी लाविन पण माझा श्रीहरि कधी येईल ते सांग. हव तर मी तुझ्या पायांत सोन्याचे कडे घालीन. पण तू लवकर माझ्या श्रीहरिला घेऊन ये त्याला जाऊन सांग आम्ही सर्व गोपी त्याची वाट पहातो आहे. त्याच्या आठवणीने आम्ही व्याकूळ झालो आहे. तू खरच सांग येतील ना श्रीहरि आमच्या अंगणी. अशाप्रकारे गोपींची विरहगाथाच ज्ञानेश्वरांनी आपल्या या अभंगात उलगडली आहे.

श्री संत तुकारामांनी कसोशीने प्रपंच केला दुकान चालवले सावकारी केली पैसा मिळत गेला तोपर्यंत सर्वांनी कौतुक केले पण दुष्काळ पडला आणि सर्व होत्याचे नव्हते झाले त्यात आवली दुसरी बायको सतत कटकट करी ते नाउमेद झाले. बारा एवढे दिवस प्रपंच केला. हाती काय लागले. नुसत्या शिव्या. बायकोच्या. लोकांच्या. त्यांना खूप वाईट वाटले. बाप मेला, आई गेली, पोटचा मुलगाही

गेला बायकोही गेली. बरच झाल की एकेक नारून देव सर्व पाश तोडत आहे. दुष्काळ पडल्याने धन्यधान्य, मानहानी सर्वच झाले ते म्हणू लागले देवा

बाप मेला न कळता। नव्हती संसाराची चिंता।
माता गेली मज देखता। तुका म्हणे हरली चिंता॥
पोर मेलें बरें झाले। देवें मायाविरहित केले॥
बरे झाले देवा निघाले दिवाळे। बरी या दुष्काळे पीडा गेली॥

आता मी फक्त तुझेच चिंतन करीन. तुझाच होऊन राहीन आता तूच माझ्या संसाराची चिंता वाहा. मी तुला भेटायला निघतो आहे. त्यांनी मनात एकच ध्यास धरिला. ते घराबाहेर पडले. सोतं, माळराने ओलांडली नदी नाले ओलांडले. पण त्यांना भान नव्हते. पुढे भामचन्द्राचा डोंगर लागला तुकोबा डोंगर चढून कड्यावर पोचले. तिथे एका गुहेत त्यांनी रहायचे ठरवले. कुणाची कटकट नाही पूर्ण एकांतवास. शंभुमहादेवाचे मंदिरात त्यानी आपले ठाण मांडले. वर आकाश खालती पृथ्वीचे आसन. यातूच माझ मन रमेन

'आकाश मंडप पृथ्वीच आसन।
रमे तेथे मन क्रीडा करी॥'

तुकोबांनी शंभुमहादेवाला नमस्कार केला, आन डोके पुसत 'विश्वाच्या नाथा। हा अनाथ तुमच्या दारी आला आहे. माझ्या वर कृपा करा तुम्हास काय उणं आहे. मला काही नको फक्त प्रेमाची शिदोरी हवी आहे. मी आनंदाने येथे राहिन आता हरि भेटल्याशिवाय मी येथून जाणार नाही. त्यानंतर त्यांनी रोज सकाळी उठून नामदेव जनाबाई ज्ञानोबांचे अभंग म्हणत. रात्री थोडीशी विश्रांती परत भजन. ते हरिभजनांत रंगुन गेले. खाण्यापिण्याचेही भान नव्हते. काही दिवसांनी त्यांना भुयार दिसले तिथेच त्यांची ब्रह्मानंदी टाळी लागली. पंधरा दिवस त्यांनी कठोर तपस्या केली. तपश्चर्या करणे एकप्रकारे समाधी अवस्थेतच होते ते. साप आले. विंचु आले वाघ आला सर्वांनी त्यांना

## संतांचे हे आर्त

(५)

त्रास दिला पण तुकोरायांना त्याचे भानच नव्हते ते म्हणतात.
पंधरा दिवसामाजी झाला साक्षात्कार।
विठोबा भेटला निराकार॥ भामगिरी पाठारी वस्ती जाण केली
वृत्ती स्थिरावली परब्रह्मी॥ सर्प विंचू व्याघ्र अंगाशी झोंबले।
पीडू ते लागले सकळीक॥ निर्वाण जाणोनि आसन घातले।
आरंभिले ध्यान देवाजीचे॥

तुकोरायांचे मन समाधानाने भरून आले त्यांना वाटले माझा
हरी माझ्या हृदयात आहे जळापरांत तो भरला आहे तो माझ्या
बरोबर चालतो बोलतो मला सांभाळतो आता मला कशाचीच
चिंता नाही मी वेड्यापाडे बोलतो तरी तो जीट करतो.
जेथे जातो तेथे तू माझा सांगाती।
चालविसी हाती धरोनिया॥ आता सर्वत्र आनंद भरला आहे
श्रीविठ्ठल मला भेटला आहे. त्याने मला दर्शन दिले आहे.
असे हे संत लोक हरिदर्शनासाठी वेडे झाले होते.

पैठणच्या संत श्री एकनाथांची व्यथा मात्र आगळीच
होती. कितीतरी पहाटे गोदावरीला स्नानाकरता जायचे. त्यांच्यामागे
ब्राह्मणांची झुंबड असे. डोके फिरा, उघडा, पाणी सोडा, जानवे धरा
कान पकडा. लोकांना भिती दाखवून दक्षिणा उकळायची. दक्षिणा
मिळाली तर ठीक नाही मिळाली तर ब्राह्मण शिव्याशाप द्यायचे.
एकनाथांना मुळीच पटत नसे. मठाभिक्षुकांची ही तऱ्हा तर
विद्वान लोक स्वतःला ज्ञानी म्हणायचे, आम्हीच पंडित आम्हीच
शास्त्री आम्हाला सगळे कळते तर पुराणिक पुराणातील वाक्ये तेच
सांगायचे. अन संन्यासी तर भगवे कपडे घातले की झाले.
पिंपळाखाली बसून येणाऱ्या जाणाऱ्या बायकांकडे त्यांचे लक्ष. वासनेने
लवलवलेले. जप करणाऱ्या लोकांचे ध्यान जपात नसायचेच
त्यामुळे एकनाथांच्या मनात सर्व चीड भरून राहिलेली. गोसावी
लोक अंगाला राख फासून सदासर्वदा चिलीम गांजा फुंकत रहायचे.
त्यांच्याभोवती प्रपंचाला कंटाळलेले, दुःखाने गांजलेले. म्हातारे कोतारे
बायाबापड्या अवतीभवती गर्दी करत. कुणाच्याच कसल्याच ताळतंत्र नाही.

## संतांचे हे आर्त



ते कायम दुःखी राहू लागले. तशातच त्यांना कोणी देवगिरीला जनार्दनपंत म्हणून परमार्थ साधणारे सत्पुरुष आहे असे सांगितले. ते दीनदुबळ्यांचे कैवारी प्रेमळ व तुझ्या मनातील तळमळ ओळखतील. हे कळताच ते त्यांना भेटायला गेले व त्यांनाच आपला गुरू मानले. पूर्ण महाराष्ट्रात गुरू शिष्य फिरले. तेथूनच एकनाथांनी अनेक तीर्थयात्रा केल्या पण प्रत्येक ठिकाणी त्यांना अत्याचार ब्राह्मणांचे वर्चस्व, गोरगरीबांवर अन्याय, जातिभेद महारांवरील अत्याचार दृष्टिस पडले त्याने ते व्यथित झाले. कर्मात शुद्धता नाही. सर्वच लबाडीचा व्यवहार

'न चले कर्माचे आचरण। विधिनिषेधाचे महिमान॥
लोपली तीर्थे जाण। देवप्रतिमा पाषाण।
न ठाके कोणाच्या कोठे भाव। अवघा लटिकाच देवसाव॥
एका जनार्दनी भेद। जेथे तेथे वसतसे॥

नाथांच्या मनास क्लेश झाले. त्यांनी ज्ञानोबाचाच वारसा पुढे चालवायचा ठरवले. पंढरीचा भेका पुन्हा भरवायचा. भक्तिमार्गाचे बीज पुन्हा नव्याने रोपायचे. हरीनामाचा गजर सगळ्यांनाच सांगायचा. गोरगरीबांना, महातान्यांना, महारांना, बाया बापड्यांना सर्वांनाच हरीनामाचा मंत्र दिला.

रामदास स्वामींना बालपणापासूनच विश्वाची चिंता लागली होती. तो काळही तसाच होता. सर्व देशात मुगलांचा उत्पात चालू होता. मारुतिरायाला शरण गेले मंत्र द्या म्हणले मारुतिरायाने त्यांना 'श्रीराम जय राम जयजय राम॥' चा मंत्र दिला. त्यांना परमानंद झाला. दिवसरात्र ते मंत्र जपायचे. लग्नाच्या बोहल्यावरून 'सावधान' म्हणताच पळून गेले. त्यांना साऱ्या विश्वाचे कल्याण करायचे होते. ते कुठून संसारात गुंतणार. घराबाहेर पडले, नाशिकजवळ नंदिनी नावाची छोटी नदी गोदावरीला मिळते. तिथे संगमाजवळ टाकळी नावाचे गाव होते. गर्द वनराईत तपश्चर्या करण्याकरता एकांतात असलेले स्थळ त्यांनी निवडले. सूर्य मध्यान्ही येईपर्यंत एका पायावर

उभे राहून ते गायत्री मंत्राचा जप करत. जोडीला 'श्रीराम जयराम' चा जप असायचा. पंधरा वर्षे अहोरात्र तपस्या त्यानंतर त्यांनी तीर्थयात्रेला सुरूवात केली. त्यांनाही एकनाथ प्रमाणेच अनुभव आला. त्याने ते दुःखी झाले. यवनांचे अत्याचार सुरूच होते. रामदासांचे मन मेणाहूनही मऊ. ते सारखे राम रायाला विनवित. अन्न मिळाले की खातो खरा पण रणांगण या पीडलेल्या लोकांच्या चिंतेने मी जळतो आहे. या सर्वांना मला सुखी करायचे आहे. अनेक स्तोत्र, आरत्या, मनाचे श्लोक रचले. मारुतीचे मंदिरे बांधली. लहानथोरांपासून सगळ्यांना चांगल्या गोष्टींचा उपदेश. असे वागावे काय करावे काय करू नये मनाच्या श्लोकात सांगितले. शिवरायांना उपदेश केला. त्यांना मुगलांच्या अत्याचाराचा विरोध करण्याचे सामर्थ्य शिवाजीमध्ये आढळले. त्यांनी शिवरायांना पत्र लिहिले

तीर्थक्षेत्रे मोडली । ब्राह्मणे भ्रष्ट झाली ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥
देवधर्म गोब्राह्मण । करावयासी संरक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥
या भूमंडळाचे ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हांकारणे ॥
कितेक दुष्ट संहारिले । कित्येकांसी धाक सुटले ।
कित्येकांसि आश्रय झाले । शिवकल्याण राजा ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणे काय तुम्हांप्रती ।
धर्मसंस्थापनेची कीर्ती । सांभाळिली पाहिजे ॥
निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसि आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥
परोपकाराचिया राशी । अखंड घडती जयासी ।
तयाचे गुणमहत्त्वासी । तुळणा कैंची ॥
यशवन्त कीर्तिवन्त । सामर्थ्यवन्त वरदवन्त ॥
पुण्यवंत आणि जयवन्त । जाणता राजा ॥

## संतांचे हे आर्त (८)

संत श्री नामदेवांची तर गोष्टच आगळी. त्यांच्या बालहट्टापुढे प्रत्यक्ष विठ्ठलाला देखील नतमस्तक व्हावे लागले. त्यांच्यासमोर बसून जेवण करावे लागले. त्यांना पांडुरंगाच्या बालपणापासूनच ध्यास लागला होता प्रपंचात मुळीच लक्ष नव्हते. गुरूच्या शोधार्थ इकडे तिकडे फिरत होते. अखेर औंढ्या नागनाथ येथे त्यांना विसोबा खेचर गुरुस्वरूपात भेटले. त्यांनी नामदेवांच्या मस्तकी हात ठेवला. खऱ्या देवाची ओळख करून दिली. देव कुण्या एका ठिकाणी नसून चराचरात व्यापला आहे. त्यामुळे नामदेवांना जळी स्थळी हरि दिसू लागला. पंढरपूरला त्यांची भेट ज्ञानदेवादि भावंडांशी झाली. त्यांच्या पायावर लोटांगण घातले. पंढरपुरी किर्तन रंगु लागले. औंढ्या नागनाथास त्यांनी किर्तन करायला सुरुवात केली. हरिहराची एकता वर्णायला लागले.

भजन करा रे हरिहरा। नारायण शिवशंकरा।
माझे बोलणे अवधारा। भेद ना करा दोघांचा॥
तुम्हांसि सांगेन सत्य वृत्तांत। पाहें पा तेथीचा दृष्टांत॥
नारायणे सेविले अमृत। झाला श्वेत महादेव॥
शंभुने गिळीले हलाहल। म्हणोनि विष्णु झाला निळा॥

शिव काय विष्णु काय दोघेही एकच आहे. दोघांमध्ये भेद करू नका. शंभू कापरासारखा गोरा आहे तर का कारण विष्णुने अमृताचे प्राशन केले म्हणून. आणि महादेवाने काळं निळं विष प्राशन केले. परिणाम विष्णुवर झाला म्हणून निळे. दोघे मिळून एकच आहे.

गावातील तथाकथित विद्वानांना रुचले नाही त्यांनी त्यांना देवळासमोर किर्तन करू नका देवळामागे करा म्हटल्यावर नामदेवांनी देवळामागे जाऊन किर्तन करण्यास सुरुवात केली अन काय आश्चर्य पूर्ण देऊळ फिरले ईश्वराने त्यांच्या भक्तीचा न्याय केला. असे हे सर्व संत यांसारखे खूप संत आपल्या ह्या पावनभूमीत जन्माला आले हे आपले अहोभाग्य!

सौ. ऐश्वर्या डमोळकर
इंदोर (मध्यप्रदेश)